मिरा-भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, भाईंदर
आ. क्र. मा.अ/१३४६/२०१८-१९
दिनांक दि. १७/७/१८

सहाय्यक संचालक नगररचना
मि. भा. म. न. पा.

जोडपत्र–अ
(नियम–3)

केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कलम–6–अन्वये माहिती मिळविण्यासाठी विनंती अर्ज.




प्रति,
शासकिय जन माहिती अधिकारी
नगररचना विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका,
मिरा रोड (पु) – 401107.

1) अर्जदाराचे संपूर्ण नाव :– सोहेल मु. खान.

2) संपूर्ण पत्ता :– बी / 406, विणा सोसायटी, टेंबा रोड, भाईंदर (प) – 401101.
मोबाईल :– 8286971461.

3) आवश्यक असलेल्या माहितीचा कालावधी :– कार्यालयीन कालावधी पासून ते आज आखेर पर्यंत.

4) माहिती टपालाव्दारे पाहिजे किंवा व्यक्तिशः :– प्रत्यक्ष येउन माहिती घेउन जाणार आहे.

5) अर्जदार दरिद्रय रेषे खालील आहे का? :– नाही.

6) आवश्यक असलेल्या माहितीचा विषय / तपशील / वर्णन / वर्गीकरणः–

जा.क्र.मनपा / विधि / 101 / 2017–18 दिनांकः–24 / 04 / 2018 रोजी मा.अतिरिक्त आयुक्त श्री.महादेव कुसेकर साहेब यांनी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व मोबाईल टॉवर्सची यादी नगररचना विभागात उपलब्ध करून देण्याबाबत जय भवानी टेली कंपनी यांना निर्देश प्रमाणे जय भवानी टेली कंपनीने नगररचना विभाग येथे सादर केलेल्या यादीची प्रत उपलब्ध करून मिळावी. हि विनंती.

ठिकाण :– ठाणे
दिनांकः– 17/07/2018

सोहेल मु. खान

# मिरा भाईंदर महानगरपालिका

नगररचना विभाग

स्वामी विवेकानंद भवन, आर.बी.के. स्कूलच्या बाजूला, कनाकिया, मिरारोड (पु.)

जा.क्र. मनपा/नर/माहिती अधिकार/१३४६/२०१८-१९ दिनांकः- ६/८/१८

केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम, २००५

M.A. (Legal) 1807 R.P.

प्रति,
श्री. सोहेल मु. खान
बी/406, विणा सोसायटी
टेंबा रोड, भाईंदर (प.) 401 101.

विषय - केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत माहिती मिळणेबाबत.

संदर्भ - केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत आपला दि.17/07/2018 रोजीचा अर्ज. (जो या कार्यालयास आवक क्र. मा.अ./1346/2018-19, दि.17/07/18 अन्वये प्राप्त)

महोदय,

विषयांकीत प्रकरणी सदंर्भिय पत्राच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, आपण संदर्भिय पत्रान्वये मे. जयभवानी टेली कंपनीने सादर केलेल्या मोबाईल टॉवर्सची यादी उपलब्ध करून मिळणेबाबत मागणी केलेली आहे.

त्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते कि, मे. जयभवानी टेली कंपनी यांची नियुक्ती कर विभागाने केलेली असून आपल्या संदर्भिय पत्रान्वये मागणी केलेली यादी आपण कर विभागाकडून प्राप्त करुन घेणे योग्य होईल.

उपरोक्त माहितीने आपले समाधान न झाल्यास केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत कलम 19(1) अन्वये आपणास प्रथम अपील हे श्री. हे.रा. ठाकूर, प्रथम अपीलीय अधिकारी तथा नगररचनाकार, नगररचना विभाग यांचेकडे सदरचे पत्र प्राप्त झाल्यापासून 30 दिवसांच्या आत दाखल करता येईल.

२०/०८/१८
प्राप्त माहिती अपूर्ण व दिशाभूल करणारी आहे.

आपला,

(राजेंद्र बी. पांगळ)
जन माहिती अधिकारी तथा
प्र. सहा. नगररचनाकार
नगररचना विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

1346

जोडपत्र–ब
(नियम–5(1))

केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कलम–19(1)–अन्वये प्रथम अपिलीय अर्ज.

प्रति,
श्री.हे.रा.ठाकूर साहेब
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
नगररचनाकार,
नगररचना विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका,
मीरा रोड (पु) – 401107.

मिरा-भाईदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, भाईंदर
क्र. प्रक्र/2351/18-19
दिनांक 06/9/18
सहाय्यक संचालक नगररचना
मि. भा. म. न. पा.

20रु. कोर्ट फी Rs.20 COURT FEE भारत INDIA बीस रुपये TWENTY RUPEES

1) अर्जदाराचे संपूर्ण नाव :– सोहेल मु. खान.

2) संपूर्ण पत्ता :– बी / 406, विणा सोसायटी, टेंबा रोड, भाईंदर (प) – 401101.
मोबाईल :– 8286971461.

3) संबंधित जन माहिती अधिकाऱ्याचा तपशील :– श्री. राजेंद्र बी. पांगळ, जन माहिती अधि–
–कारी तथा प्र.सहा. नगररचनाकार, नगररचना विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका, मिरा रोड (पु).

4) ज्या निर्णय विरूध्द प्रथम अपिल करावयाचे आहे, त्या निर्णय मिळावल्याची तारीख :–
जा.क्र.मनपा / नर / माहिती अधिकार / 1346 / 2018–19 दिनांकः–06 / 08 / 2018.

5) अपिलाची कारणे :–

अ) माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कलम–6–अन्वये दिनांकः–17 / 07 / 2018 रोजी मी माहिती उपलब्ध करून मिळविण्यासाठी नगररचना विभाग येथे विहित नमून्यात विनंती अर्ज दाखल केलेले आहे.

ब) वरील नमूद अर्ज केल्यावर संबंधित जन माहिती अधिकारी यांनी जा.क्र.मनपा / नर / माहिती अधिकार / 1346 / 2018–19 दिनांकः–06 / 08 / 2018 रोजीचे पत्रान्वये मला अपूर्ण, त्रुटियुक्त व दिशाभूल करणारी माहिती देणेत आलेली आहे.

क) वरील नमूद कारणामुळे प्रथम अपिलीय अधिकारी या नात्याने आपण प्रत्यक्ष लक्ष घेउन मला नियमानुसार परिपूर्ण माहिती उपलब्ध करून मिळविण्यासाठी पुढील योग्य ती काय–
–देशीर सहकार्य करावे. हि विनंती.

6) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील :–

अ) आवश्यक असलेल्या माहितीचा विषय व स्वरूप :– जसे आहे तसेच.

ब) आवश्यक असलेल्या माहितीशी संबंधित विभाग किंवा कार्यालय :– नगररचना विभाग.

ठिकाण :– ठाणे
दिनांकः–06 / 09 / 2018

सोहेल मु. खान

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगररचना विभाग**

**स्वामी विवेकानंद भवन, आर.बी.के. स्कूलच्या बाजूला, कनाकिया, मिरारोड (पु.)**


**जा.क्र. मनपा/नर/माहिती अधिकार/प्रथम अपील/3६६९/२०१८-१९ दिनांकः- ६/९/२०१८**

**केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम, २००५**

प्रति,
श्री. सोहेल खान
बी/406, विणा सोसायटी, टेंबा रोड,
भाईंदर (प.)                    ------ (अपीलकर्ता)

07/09/2018.

विषय - केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत कलम 19(1) अन्वये प्रथम अपील सुनावणीसाठी हजर रहाणेबाबत.

संदर्भ - 1) केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत आपला जनमाहिती अधिकारी, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेकडेस केलेला दि.17/07/2018 रोजीचा अर्ज.

2) जनमाहिती अधिकारी तथा प्रभारी सहा. नगररचनाकार, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे कार्यालयाचे आपणास पत्र क्र. मनपा/नर/1346/2018-19, दि.06/08/2018 अन्वये दिलेले उत्तर.

3) केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत कलम 19(1) अन्वये आपला दि.06/09/2018 रोजीचा प्रथम अपील अर्ज.

महोदय,

केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत संदर्भ क्र. 1 मध्ये नमुद अर्जान्वये आपण या कार्यालयाचे जनमाहिती अधिकारी तथा प्र. सहा. नगररचनाकार यांचेकडून माहिती अपेक्षिलेली होती व त्याअनुषंगाने त्यांनी संदर्भ क्र. 2 मध्ये नमुद पत्रान्वये आपणास माहिती कळविलेली आहे तथापि सदरच्या माहितीने आपले समाधान न झाल्याने आपण केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत कलम 19(1) अन्वये प्रथम अपील हे या कार्यालयास संदर्भ क्र. 3 मध्ये नमुद अर्जान्वये दाखल केलेले आहे.

त्याअनुषंगाने उपरोक्त अधिनियमाच्या कलम 19(1) अंतर्गत दाखल केलेल्या आपल्या प्रथम अपील अर्जा संदर्भात सुनावणी ही दि.10/09/2018 रोजी सकाळी 10.30 वाजता निम्नस्वाक्षरीधारक यांचे कार्यालयास आयोजित करण्यात आलेली आहे. तरी कृपया सदरच्या सुनावणीसाठी आपल्याकडील कागदपत्रांसह व लेखी माहिती द्यावयाची असल्यास त्यासह दि.10/09/2018 रोजी सकाळी 10.30 वाजता सुनावणीसाठी या कार्यालयात उपस्थित रहावे ही विनंती.

सदरच्या सुनावणीसाठी आपण उपस्थित राहिला नाहीत तर आपल्या अर्जावर आपल्या अनुपस्थितीत नियमानुसार उचित निर्णय घेणेत येईल याची नोंद घ्यावी.

आपला,

**(हे.रा. ठाकूर)**
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**नगररचनाकार**
**नगररचना विभाग, मिरा-भाईंदर महानगरपालिका**

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना

1) जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक नगररचनाकार, नगररचना विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका
2) सहाय्यक जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता नगररचना विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगररचना विभाग**

**स्वामी विवेकानंद भवन, आर.बी.के. स्कूलच्या बाजूला, कनाकिया, मिरारोड (पु.)**

M.A. (Legal) 2018 S. K. – APPEAL LETTER – FINAI (9)

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा नगररचनाकार, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेसमोर**
**केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (1) अंतर्गत प्रथम अपील**

श्री. सोहेल खान
बी/406, विणा सोसायटी
टेंबा रोड, भाईंदर (प.) 401 101 ...... (अपीलकर्ता)

विरूध्द

1) श्री. राजेंद्र पांगळ
तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्र. सहाय्यक नगररचनाकार
मिरा भाईंदर महानगरपालिका

2) श्री. श्रीकृष्ण मोहीते ...... प्रतिवादी
सहा. जन माहिती अधिकारी, नगररचना विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

## - विवेचन -

श्री. सोहेल खान यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत जन माहिती अधिकारी, नगररचना विभाग यांचेकडेस दि.17/07/2018 रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केलेला आहे.

"मे. जय भवानी टेली कंपनी यांना मोबाईल टॉवर्स उभारणेकरिता देण्यात आलेल्या परवानगीबाबत."

अपिल दाखल करण्याची कारणे :-

संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी पत्र क्र. मनपा/नर/माहिती अधिकार/1346/2018-19 दि.06/08/2018 अन्वये संबंधीत अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिलेली माहितीने समाधान न झाल्याने यांनी उपरोक्त अधिनियमाच्या कलम 19(1) अन्वये दि.06/09/2018 रोजीच्या अर्जान्वये (आवक क्र. प्रअ/239/2018-19, दि.06/09/2018) प्रथम अपिलीय अधिकारी तथा नगररचनाकार यांचेकडेस प्रथम अपील दाखल केलेले आहे.

सुनावणीचा तपशिल :-

अपीलार्थी, जनमाहिती अधिकारी व सहा.जन माहिती अधिकारी, यांना प्रथम अपिल अर्जाचे अनुषंगाने सुनावणीस दि.10/09/2018 रोजी सकाळी 10.30 वाजता उपस्थित राहणेबाबत जा.क्र.मिभा/मनपा/नर/माहिती अधिकार/प्रथम अपील/3488//2018-19, दि.28/08/2018 अन्वये कळविण्यात आले होते. सदरच्या सुनावणीस विद्यमान जनमाहिती अधिकारी व अपिलार्थी हे उपस्थित आहेत.

1) अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तीवाद :- "माझ्या दि.17/07/2018 रोजीच्या अर्जान्वये अपेक्षिल्यानुसार मला माहिती ही मला मिळालेली नाही. तरी त्यानुसार अपेक्षिलेली माहिती ही तात्काळ विनाशुल्क मिळावी."
2) विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तीवाद :- "अपिलार्थी यांचे दि.17/07/2018 रोजीच्या अर्जाचे अनुषंगाने तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी पत्र क्र. मनपा/नर/1346/2018-19, दि.06/08/2018 अन्वये विहीत कालावधीत ही उपलब्ध करुन दिलेली आहे."

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगररचना विभाग**

**स्वामी विवेकानंद भवन, आर.बी.के. स्कूलच्या बाजूला, कनाकिया, मिरारोड (पु.)**


M.A. (Legal) 2018 S. K. – APPEAL LETTER – FINAI (9)

वरील वस्तुस्थिती विचारात घेवून खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

- निर्णय -

1) अपिलार्थी यांचे दि.17/07/2018 रोजीच्या अर्जाचे अनुषंगाने त्यांनी अपेक्षिलेली माहिती ही सदरचा निर्णय प्राप्त झाल्यापासून 10 दिवसांचे आंत विनाशुल्क उपलब्ध करुन द्यावी.
2) सबब सदर अपिल निकाली काढणेत येत आहे.
3) सदर आदेशाविरूध्द उपरोक्त अधिनियमातील कलम 19(3) अन्वये दुसरे अपील करावयाचे असल्यास मा. राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, 5 वा मजला, दालन क्र 528, कोकण भवन, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई 400614 यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून 90 दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

जा.क्र. मनपा/नर/माहीती अधिकार/प्रथम अपील/ 4273/2018-19
दि. 10 /10 /2018

(हे.रा. ठाकुर)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
नगररचनाकार
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित

1) श्री. सोहेल खान
बी/406, विणा सोसायटी
टेंबा रोड, भाईंदर (प.) 401 101 ...... (अपीलकर्ता)

2) श्री. केशव शिंदे
जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक नगररचनाकार
मिरा भाईंदर महानगरपालिका

3) श्री. प्रशांत कोळी
कनिष्ठ लिपिक, नगररचना विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका